# आरती भवानीची

जय देवी जय देवी जय जगज्जननी
आरती ओवाळितो तुज मायभवानी
जय देवी जय देवी ॥धृ.॥

शिवलिंगाकार मुकुट शोभे शिरी
सुवर्णमंडित कौस्तुभ लटके ऊरी
चंदन कुंकुम मळवट ललाटी
सुमने दागिन्यांची तनुवर दाटी
जय देवी जय देवी ॥१॥

मयूरकुंडले झळकती श्रवणी
सुस्मित सुंदर फुलविते जिवणी
दया पाझरे अर्धोन्मिलीत नयनी
घाली दिव्य मुख मनावर मोहिनी
जय देवी जय देवी ॥२॥

ल्याली लाल लुगडे हिरवी चोळी
वस्त्र प्रावरणे वरी निळी पिवळी
जसे इंद्रधनु सप्तरंगी आभाळी
हर्षोल्हासी रंग आम्हावरी उधळी
जय देवी जय देवी ॥३॥

- नारायण
आश्विन शु. ७, शके १९४३
(१०/१२/२१)